२११

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## जाहीर सूचना

**बृहन्मुंबई पोलीस विभाग यांना मक्त्याने दिलेल्या भुभागाचे नुतनीकरण करण्याबाबत.**

बृहन्मुंबई महानगरपालिकेने, बृहन्मुंबई पोलीस विभाग यांना वेळोवेळी बृहन्मुंबई महानगरपालिकेचे भुभाग मक्त्याने दिलेले आहेत. या भुभागांचा मक्ता कालावधी संपुष्टात आलेला आहे.

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी दि.१५.०४.२०१९ च्या पत्र क्र. ३१७/पोआ/मक्ता/स्वी.स/२०१९ तसेच दि. ०१.०६.२०१९ च्या पत्र क्र. ३८३-अ/पोआ/स्वी.स./मक्ता/२०१९ अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेने मक्त्याने दिलेल्या १७ भुभागांचे मक्ता नुतनीकरण करण्याकरीता विनंती केली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या पोलिस विभागास मक्त्याने दिलेल्या व मक्ता कालावधी संपुष्टात आलेल्या १७ भूखंडांचे, मक्ता नूतनीकरण करण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागाकडून उपलब्ध अभिलेखाच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. सदर प्रस्तावांच्या धारिणी सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) विभाग कार्यालयात परिक्षणार्थ उपलब्ध आहेत.

सदर मक्ता संपुष्टात आलेल्या भुभागांच्या मक्ता नुतनीकरण प्रस्तावाबाबत कोणास हरकत असल्यास सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) विभागास संबंधीत कागदपत्रे / पुराव्यांसह, त्यांची तपशीलवार हरकत लेखी स्वरुपात खालील पत्त्यावर किंवा ac.estate@mcgm.gov.in या ईमेल आयडी वर दि १६.०८.२०१९ पर्यंत सादर करावीत.

संदर्भित भुखंडांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ क्र | भुखंड तपशील | क्षेत्रफळ (चौ.वार) | अ.क्र | भुखंड तपशील | क्षेत्रफळ (चौ.वार) |
|---|---|---|---|---|---|
| १. | भूकर क्र. ४३५, योजना क्र. १६, वुड हॉऊस रोड, कुलाबा विभाग | ६५७८ | १०. | भूकर क्र. १४९८, योजना क्र. ४५, पलटन रोड फोर्ट विभाग | ५८९२ |
| २. | भूकर क्र. २५३, योजना क्रं. १४, १ ला नागपाडा रोड, भायखळा विभाग | ३९५७ | ११. | भूकर क्र. ७०६, योजना क्रं. ४६, नायगाव, दादर नायगांव विभाग, | १०११४ |
| ३. | भूकर क्र. ९७९, योजना क्र. २४, भूभाग क्र. ३०, प्रिंसेस स्ट्रीट, भुलेश्वर विभाग | १४९२ | १२. | भूकर क्र.१३९५-१३९७, योजना क्र. ४८, माहीम, माहीम विभाग | ६८१७ |
| ४. | भूकर क्र. ५१३, भूभाग क्र. २८ आणि २९, गांवदेवी, मलबार हिल विभाग, | १७९४ | १३. | भूकर क्र. २३/१७२१, योजना क्रं.५५, चिंचबंदर रोड, मांडवी विभाग, | २९४७ |
| ५. | भूकर क्र. १२१२, योजना क्र. ३४, लॅमिंग्टन रोड, गिरगाव विभाग | ६१९० | १४. | भूकर क्रमांक १५५, योजना क्रं. ५५-ए, ओल्ड पिटर्स स्कुल स्थित, माझगांव विभाग | ५४७१ |
| ६. | भूकर क्र. १०६९, योजना क्र. ३५, भूभाग क्र. ६५, सॅडहर्स्ट रोड (पश्चिम),गिरगाव विभाग | ८६८ | १५. | भूकर क्र. ३/१०, योजना क्रं. ६३, भूभाग क्र. ४,५, आणि ६, किंग वे माटुंगा, माटुंगा विभाग | ८४०७ |
| ७. | भूकर क्र. १५१८, योजना क्र. ३९, भूभाग क्र.३५, सॅडहर्स्ट रोड (पूर्व), मांडवी विभाग | २८१४ | १६. | भूकर क्र. ७१० आणि ७११, योजना क्र.६७, नायगांव, दादर नायगांव विभाग | ३६५३१ |
| ८. | भूकर क्र. ३८९, योजना क्रं. ४०, माझगाव विभाग | १४६०५ | १७. | भूकर क्र.१/१८९९, योजना क्र. ७०,आर्थर रोड, भायखळा विभाग | १७४४ |
| ९. | भूकर क्र. ४६१, योजना क्रं. ४४, महारबावडी, गिरगांव विभाग | २७१३ | | | |

उपरोक्त कालावधीत प्राप्त झालेल्या हरकतींचा योग्यतेनुसार विचार करण्यात येईल आणि मक्ता नुतनीकरणाबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल. तथापि, दि. १६.०८.२०१९ नंतर प्राप्त होणा-या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) यांच्या कार्यालयाचा पत्ता मनपा मुख्यालय, विस्तारीत इमारत, ४ था मजला, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई- ४००००१.

०९/०८/२०१९

(केशव वि.उबाळे)

**सहाय्यक आयुक्त (मालमत्ता)**